# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २९.१०.२०१८

जयदेव प्रकाश गहाणे, वय ३० वर्ष, रा. पुराडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली हा गडचिरोली जिल्हयातील विविध भागात अवैध देशी विदेशी दारुची तस्करी करणे, विक्री करणे या सारखे गंभीर गुन्हे करत होता. सध्या त्याच्या विरुध्द ०७ गुन्हे दाखल असुन ०४ गुन्हे हे न्यायप्रविष्ट आहेत.

यापुर्वी जयदेव प्रकाश गहाणे याच्यावर सन २०१७ मध्ये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येवुन सुध्दा त्याच्या वर्तणुकीत सुधारणा झाली नाही व तो अवैध दारुची तस्करी व विक्रीचा व्यवसाय करीत होता. प्रतिबंधक कालावधीत देखील त्याच्यावर अवैध दारुविक्री संबंधाने गुन्हा दाखल असुन त्याबद्दल त्याला दोषी ठरवून ५,०००/- रुपये दंडाची शिक्षा देण्यात आली होती. तरी देखील त्याचे अवैध दारुची वाहतुक व विक्री करण्याच्या कृत्यात वाढ होत होती. त्याचेवर कायदयाचे भय असल्याचे दिसुन येत नव्हते. त्याचे कृत्य सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री शैलेश बलकवडे, मा.अपर पोलीस अधिक्षक, श्री महेंद्र पंडित, उपविभागीय पोलीस अधिकारी, कुरखेडा श्री शैलेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन पुराडा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री महाले यांनी जयदेव गहाणे याच्यावर महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभटटी वाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हे, धोकादायक व्यक्ती आणि दृकश्राव्य कला कृतीचे बिना परवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती (व्हीडीओ पायरेट्स), वाळु तस्कर आणी जिवनावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणारे व्यक्ती यांचे विघातक कृत्यांना आळा घालण्याचा अधिनियम १९८१ (एम.पी.डी.ए. ॲक्ट ) नुसार स्थानबध्द करण्याचा प्रस्ताव मा. जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांना सादर केलेला होता. मा. जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांनी सदर प्रस्तावास मान्यता देवून जयदेव गहाणे यास स्थानबध्द करण्याचा आदेश निर्गमीत केल्याने त्यास अटक करुन जिल्हा कारागृह, चंद्रपुर येथे स्थानबध्द केले आहे. अवैध दारु व्यवसायास आळा घालण्याकरीता एम. पी.डी.ए. ॲक्ट नुसार कारवाया करण्याचे निर्देश मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री शैलेश बलकवडे यांनी जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी यांना दिलेले आहेत.